Nijampur Jaitane Shikshan Prasarak Mandalache

# Jagannath Kadwadas Shah Adarsh Mahavidyalay

Nijampur-Jaitane-424305,Tal--Sakri,Dist-Dhule,Maharashtra,India

**NAAC Re-Accredited**

(Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon)

Website: www.njspmaca.in
Principal Dr.Ashok Pitambar Khairnar

Email: acanjspm@yahoo.in
Office No.: 02568-276605

Outward No. Date: 07/03/2022

Nijampur Jaitane Shikshan Prasarak Mandalache
Jagannath Kadwadas Shah Adarsh Mahavidyalay
Nijampur-Jaitane-424305,Tal--Sakri,Dist-Dhule,Maharashtra,India
NAAC Re-Accredited
(Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon)
Website: www.njspmaca.in
Principal Dr.Ashok Pitambar Khairnar
Email: acanjspm@yahoo.in
Office No.: 02568-276605
Outward No. Date: 07/03/2022

## 2.2 Number of seats earmarked for reserved category as per Government of India/ Government of Maharashtra rule

**During Academic Year 2016-17 to 2020-21**

| Academic Year | Total Admission Intake Seats | Number of seats earmarked for reserved category as per Government of India/ Government of Maharashtra rule | Total Admitted Students | Number of Admission for reserved category as per Government of India/ Government of Maharashtra rule | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | SC (13%) | ST (7%) | OBC (19%) | Other (13%) | General (48%) |
| 2016-17 | 460 | 239 | 373 | 37 | 97 | 141 | 71 | 27 |
| 2017-18 | 460 | 239 | 353 | 30 | 111 | 101 | 92 | 19 |
| 2018-19 | 460 | 239 | 326 | 28 | 80 | 128 | 78 | 12 |
| 2019-20 | 460 | 239 | 337 | 16 | 93 | 137 | 71 | 20 |
| 2020-21 | 460 | 239 | 355 | 19 | 105 | 141 | 78 | 12 |

Jagannath Kadwadas Shah Adarsh Mahavidyalay Nijampur-Jaitane TAL.SAKRI DIST.DHULE (M.S.)

Dr.Ashok Pitambar Khairnar
Principal

PRINCIPAL
Nijampur - Jaitane Shikshan Prasarak Mandalache
Jagannath Kadwadas Shah Adarsh Mahavidyalay
Nijampur - Jaitane Tal.Sakri Dist.Dhule

**2.2 Number of seats earmarked for reserved category as per Government of Maharashtra Rule**


महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dirhe.org.in

E-Mail : info@dirhe.org.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३


क्र.अशाम/२००९/३१६२३/२८६/पुवि/मवि-२. 3९११ दि.

प्रति,

१. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

२. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

शिक्षण सहसंचालक (उ. शि.)
जळगांव विभाग, जळगांव.
जावक नंबर 697
दिनांक 5/10/09
विभाग

**विषय : आरक्षण कायदा २००४ नुसार कार्यवाही करणेबाबत**

संदर्भ : शासन पत्र क्र.बीयुसी-२००९/(प्र.क्र.२०५/०९)/मशि-५, दि.३/८/२००९.

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अवलोकन व्हावे. सदर पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे तसेच अशा प्रकारची पुनरावृत्ती अन्य संस्थांच्या बाबतीत होवू नये म्हणून बिंदूनामावली तपासून देतांना आरक्षण कायदा २००४ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

सोबत आरक्षण कायदा २००४ ची छायांकित प्रत जोडली आहे.

(डॉ.स.वि.किर्दक)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
- 5 AUG 2009
39823
आवक क्र.:-
शाखा:- मवि२ (२८)

क्रमांक : बीयुसी-२००९/(प्र.क्र.२०५/०९)/मशि-५
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४००० ३२.
दिनांक :- ०३ ऑगस्ट, २००९.

प्रति,
कुलसचिव
पुणे विद्यापीठ,
पुणे.

**विषय:-** शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेच्या बिंदुनामावली बाबत...

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेच्या सर परशुरामभाऊ (स. प.) महाविद्यालय, पुणे येथील शिक्षकेतर पदांची बिंदुनियमावली सामान्य प्रशासन विभागाने तपासली असता त्यामध्ये मोठया प्रमाणात मागासप्रवर्गाच्या रिक्त जागांवर खुल्या प्रवर्गातुन नियुक्त्या दिल्याचे सामान्य प्रशासन विभागास आढळुन आले असून त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर त्याचबरोबर संस्थेवर आवश्यक ती कार्यवाही करुन शिल्लक पदांचा अनुशेष त्वरित भरुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्यात सादर करण्याबाबत कळविले आहे.

२. संस्थेने दि.३०.०५.०९ रोजी शिपाई या संवर्गातील कार्यरत रिक्त पदांचा जो गोषवारा सादर केला त्यानुसार स्पष्ट होते की अद्याप ४ पदावर खुल्या प्रवर्गाचे कर्मचारी कार्यरत आहेत. वास्तविक संस्थेने २४ पदांचा अनुशेष भरणे आवश्यक होते. एखाद्या संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या आरक्षण धोरणाचा अवमान करुन नियुक्त्या परीक्षतया दिलेल्या असल्यास बिंदुनामावल्या तपासून देणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्वरित ही बाब सामान्य प्रशासन विभागाच्या तसेच प्रशासकीय विभागाच्या निदर्शनास आणुन संस्थेबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक असते. तथापि प्रबंधक (मावक) पुणे विद्यापीठ यांनी या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करुन शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेच्या बिंदु नामावल्या तपासून दिल्या आहेत. यामुळे वर्षानुवर्षे आरक्षित पदावर खुल्या प्रवर्गाचे कर्मचारी काम करीत आहेत व त्यानुसार आरक्षण कायदा २००४ मधील तरतुदीचा भंग झाला आहे.

३. वरील वस्तुस्थिती लक्षात घेता सदर प्रकरणी आरक्षण कायदा विचारात घेऊन संबंधितांवर आवश्यक ती कार्यवाही करावी तसेच शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेच्या सर परशुरामभाऊ (स. प.) महाविद्यालय, पुणे येथील शिक्षकेतर पदांची बिंदूनामावली सुधारित करण्याबाबत संबंधित संस्थेला तात्काळ आपल्यास्तरावरुन सूचना देण्यात याव्यात

(स्वा. अ. बोरसे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात येते की शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या तसेच अशप्रकारची पुनरावृत्ती अन्य संस्थांच्या बाबतीत होवू नये म्हणुन आपल्या विभागातील व विभागाच्या अधिपत्याखालील बिंदुनामावली तपासून देणाऱ्या अधिकाऱ्यांना आरक्षण कायदा २००४ नुसार कार्यवाही करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

२) कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, १६ ब, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. यांना माहितीस्तव अग्रेषित

असा. क्र. ९

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जानेवारी २२, २००४/माघ २, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.—अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी लोकसेवांमधील व पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरिता आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम — पृष्ठे ५१-५८

दिनांक २० जानेवारी २००४ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २२ जानेवारी २००४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी लोकसेवांमधील व पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरिता आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी लोकसेवांमधील रिक्त जागांसाठी व पदांकरिता आरक्षण करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "नियुक्ती प्राधिकरण" याचा लोकसेवा व पदे यांच्या संबंधातील अर्थ, अशा सेवांमध्ये किंवा पदांवर नियुक्ती करण्यासाठी अधिकार प्रदान केलेले प्राधिकरण , असा आहे ;

(ख) "निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती)" याचा अर्थ, शासनाने, वेळोवेळी विमुक्त जाती म्हणून घोषित केलेल्या जमाती असा आहे ;

(ग) "आस्थापना" याचा अर्थ, शासनाचे किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही अधिनियमान्वये घटित केलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे किंवा सांविधिक प्राधिकरणाचे कोणतेही कार्यालय, किंवा विद्यापीठ किंवा जिच्यातील भाग भांडवल, शासनाने धारण केले आहे अशी कंपनी किंवा महामंडळ किंवा सहकारी संस्था किंवा शासकीय अर्थसहाय्यित संस्था, असा आहे.

**स्पष्टीकरण.**— या खंडाच्या प्रयोजनार्थ, शासकीय अर्थसहाय्यित संस्था या शब्दप्रयोगात, ज्या संस्थांना किंवा उद्योगांना शासनाकडून हा अधिनियम लागू होण्याच्या पूर्वी अथवा त्यानंतर, सवलतींच्या दराने शासकीय जमिनीच्या स्वरूपात किंवा शासनाकडून इतर कोणत्याही आर्थिक सवलतींच्या स्वरूपात सहाय्य देण्यात आलेले आहे, किंवा ज्यांना शासनाकडून मान्यता, परवाना देण्यात आला आहे, ज्यांच्यावर शासनाकडून देखरेख किंवा नियंत्रण ठेवण्यात येते, अशा संस्थांचा किंवा उद्योगांचाही अंतर्भाव होतो ;

(घ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ङ) "गट "अ", "ब", "क" किंवा "ड"" याचा अर्थ, शासनाने, याबाबत, वेळोवेळी दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे वर्गीकरण केल्याप्रमाणे गट "अ", "ब", "क" किंवा यथास्थिति, "ड" च्या कक्षेत येणारी पदे, असा आहे ;

(च) "भटक्या जमाती" याचा अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उपजीविकेच्या शोधार्थ भटकंती करणाऱ्या शासनाने, वेळोवेळी घोषित केलेल्या जमाती, असा आहे ;

(छ) "इतर मागासवर्ग" याचा अर्थ, शासनाने, घोषित केलेला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांचा वर्ग, आणि त्यात भारत सरकारने महाराष्ट्र राज्याच्या संबंधात इतर मागासवर्ग म्हणून घोषित केलेल्या नागरिकांचा समावेश आहे, असा आहे ;

(ज) " विहित " याचा अर्थ, शासनाने या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(झ) " लोकसेवा व पदे " याचा अर्थ, राज्याच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सेवा व पदे, असा आहे आणि त्यामध्ये,—

(एक) स्थानिक प्राधिकरण ;

१९६१ चा महा. २४. (दोन) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये स्थापन केलेली व जिच्यात राज्य शासन भागधारक आहे अशी सहकारी संस्था ;

(तीन) शासनाच्या मालकीचे व शासनाने नियंत्रित केलेले, केंद्रीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे

१९५६ चा १. किंवा अधिनियमान्वये स्थापन झालेले मंडळ किंवा महामंडळ किंवा सांविधिक संस्था किंवा कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केलेली शासकीय कंपनी ;

(चार) महाराष्ट्र अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये स्थापन केलेल्या विद्यापीठासह, शासनाचे सहायक अनुदान घेणारी, शासनाच्या मालकीची व शासनाने नियंत्रित केलेली शैक्षणिक संस्था ;

(पाच) आस्थापना ; आणि ;

(सहा) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, शासकीय आदेशाद्वारे ज्या बाबतीत आरक्षण लागू केले होते आणि ज्याचा उप खंड (एक) ते (पाच) मध्ये समावेश केलेला नाही अशा, सेवांचा व पदांचा समावेश होतो ;

(त्र) " सेवा भरती वर्ष " याचा अर्थ, ज्या इंग्रजी कॅलेंडर वर्षात प्रत्यक्षात सेवा भरती केली ते वर्ष, असा आहे ;

(ट) " आरक्षण " याचा अर्थ, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्या सदस्यांसाठी सेवांमध्ये पदांचे आरक्षण, असा आहे ;

(ठ) " अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती " यांना, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३६६ याच्या खंड (२४) व (२५) मध्ये अनुक्रमे त्यांना नेमून दिलेले अर्थ असतील ;

(ड) " विशेष मागास प्रवर्ग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाने, विशेष मागास प्रवर्ग म्हणून घोषित केलेला, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास नागरिकांचा वर्ग, असा आहे.

३. (१) हा अधिनियम,— प्रयोज्यता.

(क) वैद्यकीय, तंत्र व शिक्षण क्षेत्रातील अति विशेषीकृत पदे ;

(ख) बदली किंवा प्रतिनियुक्तीद्वारे भरावयाची पदे ;

(ग) पंचेचाळीस दिवसांपेक्षा कमी कालावधीसाठीच्या तात्पुरत्या नियुक्त्या ; आणि

(घ) कोणत्याही संवर्गातील किंवा श्रेणीतील एकल (एकाकी) पद, यांव्यतिरिक्त, लोक सेवांमधील व पदांवरील सर्व नियुक्त्यांना लागू होईल.

(२) कलम २ मधील खंड (ग) च्या स्पष्टीकरणामध्ये तरतूद केल्याप्रमाणे, कोणत्याही सहाय्य देण्यासंबंधात कोणत्याही आस्थापनेशी करार करताना किंवा अशा कराराचे नूतनीकरण करताना, राज्य शासन अशा आस्थापनेने या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करावे अशी अट (अशा करारात) समाविष्ट करील.

आरक्षण व टक्केवारी.

४. (१) या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये अन्यथा तरतूद केली नसेल तर, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग, यांसाठी राखून ठेवलेल्या जागा अशा जातीतील, जमातीतील, प्रवर्गातील किंवा वर्गातील नसलेल्या उमेदवारांद्वारे भरण्यात येणार नाहीत.

(२) या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, कलम २ च्या खंड (ञ) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या लोकसेवांच्या आणि पदांच्या थेट भरतीच्या वेळी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांतील व्यक्तींसाठी खाली तरतूद केल्याप्रमाणे पदे राखून ठेवण्यात येतील :—

| जाती/जमाती/प्रवर्ग/ वर्गाचे वर्णन | राखून ठेवावयाच्या रिक्त पदांची किंवा जागांची टक्केवारी |
|---|---|
| (१) अनुसूचित जाती | १३ टक्के ; |
| (२) अनुसूचित जमाती | ७ टक्के ; |
| (३) निरधिसूचित जमाती (अ) | ३ टक्के ; |
| (४) भटक्या जमाती (ब) | २.५ टक्के ; |
| (५) भटक्या जमाती (क) | ३.५ टक्के ; |
| (६) भटक्या जमाती (ड) | २ टक्के ; |
| (७) विशेष मागास प्रवर्ग | २ टक्के ; |
| (८) इतर मागासवर्ग | १९ टक्के |
| एकुण | ५२ टक्के ; |

परंतु, शासनास, राजपत्रातील आदेशाद्वारे, अशी तरतूद करता येईल की, सर्व पदांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्या करिता ठेवावयाच्या आरक्षणाच्या टक्केवारीची तरतूद ही,—

(एक) राज्य प्रवर्गातील पदांच्या बाबतीत, राज्याच्या नवीनतम जनगणना अभिलेखाच्या आधारे, व

(दोन) जिल्हा प्रवर्गातील पदांच्या बाबतीत संबंधित जिल्ह्याच्या नवीनतम जनगणना अभिलेखाच्या आधारे,

करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, "उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअरचे)" तत्त्व, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त, वर नमूद केलेल्या सर्व प्रवर्गांना लागू असेल.

**स्पष्टीकरण एक.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " निरधिसूचित जमाती (अ) ", " भटक्या जमाती (ब) ", " भटक्या जमाती (क) " आणि " भटक्या जमाती (ड) " या शब्दप्रयोगांचा अर्थ, शासनाने, याबाबत वेळोवेळी काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे " निरधिसूचित जमाती (अ) ", " भटक्या जमाती (ब) ", " भटक्या जमाती (क) ", आणि " भटक्या जमाती (ड) " म्हणून घोषित केलेल्या अशा जमाती किंवा पोट-जमाती, असा आहे.

**स्पष्टीकरण दोन.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " उन्नत व प्रगत " या शब्दप्रयोगाचा अर्थ, शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने याबाबत वेळोवेळी काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे घोषित केल्याप्रमाणे " उन्नत व प्रगत " प्रवर्गात मोडणाऱ्या व्यक्ती, असा आहे : प्रयोज्यता.

परंतु तसेच, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, रायगड, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये कोणत्याही शासकीय आदेशांन्वये क व ड गटांतील पदांच्या थेट भरतीसाठी अनुसूचित जमातीकरिता अतिरिक्त आरक्षण अंमलात असल्यास, असे आरक्षण अशा आदेशांमध्ये सुधारणा करण्यात येईपर्यंत किंवा ते रद्द करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

(३) पोट-कलम (२) खालील तक्त्यातील अनुक्रमांक (३) ते (६) (दोन्ही धरून) मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गांसाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असेल. उक्त कोणत्याही प्रवर्गासाठी राखून ठेवलेल्या पदांकरिता योग्य उमेदवार त्याच सेवाप्रवेश वर्षात उपलब्ध न झाल्यास, अशी पदे, उक्त इतर कोणत्याही प्रवर्गातील योग्य उमेदवारांना नियुक्त करून भरण्यात येतील.

(४) विभागीय स्तरावरील किंवा जिल्हा स्तरावरील सर्व पदांमध्ये शासनाने त्याबाबतीत अधिसूचित केले असेल त्याप्रमाणे, अशा गट-क आणि गट-ड च्या प्रवर्गांमध्ये सेवाप्रवेश वर्षात निर्माण होणाऱ्या आरक्षणाची टक्केवारी अशा विभागीय किंवा जिल्हा स्तरावरच फक्त राखली जाईल.

५. (१) पदोन्नतीतील आरक्षण, हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर असेल. पदोन्नत्यांमधील आरक्षण.

(२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास, पदोन्नतीद्वारे भरावयाच्या कोणत्याही पदांसाठी आरक्षणाची तरतूद करणारे शासनाचे आदेश अंमलात असल्यास, शासनाकडून त्यांमध्ये फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते रद्द करण्यात आले नसतील तर ते, अंमलात असण्याचे चालू राहतील.

६. (१) कोणत्याही सेवाप्रवेश वर्षाच्या संबंधात कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये, व्यक्तींच्या कोणत्याही प्रवर्गासाठी राखीव असलेली कोणतीही जागा रिक्त राहिल्यास, अशी रिक्त जागा, सरळ सेवा भरतीच्या बाबतीत पाच वर्षांपर्यंत आणि पदोन्नतीच्या बाबतीत तीन वर्षांपर्यंत पुढे नेण्यात येईल : राखीव असलेल्या रिक्त जागा पुढे नेणे.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास मागासवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे अशी पदे भरण्यासंबंधीचे कोणतेही शासकीय आदेश अंमलात असल्यास, असे शासकीय आदेश त्यामध्ये शासनाकडून फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते रद्द करण्यात आले नसतील तर, अंमलात असण्याचे चालू राहतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे एखादी रिक्त जागा पुढे नेण्यात आली असेल तेव्हा, ज्या सेवाभरती वर्षामध्ये ती पुढे नेण्यात आली असेल त्या सेवाभरती वर्षाकरिता संबंधित व्यक्तींच्या प्रवर्गासाठी राखीव असलेल्या रिक्त जागांच्या नियत वाटपामध्ये ती हिशेबात धरली जाणार नाही :

परंतु, नियुक्ती प्राधिकारी, अशा न भरलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी कोणत्याही वेळी विशेष सेवाभरती मोहीम हाती घेईल आणि जर अशा विशेष सेवाभरती मोहिमेनंतरही अशा रिक्त जागा भरल्या गेल्या नाहीत तर, त्यानंतर, शासन विहित करील अशा रीतीने त्या जागा भरण्यात येतील.

७. (१) शासन लेखी आदेशाद्वारे, प्रत्येक नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे किंवा त्या प्राधिकाऱ्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याकडे या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्याची जबाबदारी सोपवील. अधिनियमाचे अनुपालन करण्याची जबाबदारी व अधिकार.

(२) शासन त्याच रीतीने पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नियुक्ती प्राधिकाऱ्याला किंवा त्या अधिकाऱ्याला, पोट-कलम (१) अन्वये अशा प्राधिकाऱ्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे सोपविलेले असे कर्तव्य परिणामक रीतीने पार पाडण्यासाठी अशा प्राधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास आवश्यक असतील असे अधिकार किंवा प्राधिकार विनिहित करील.

शास्ती. ८. (१) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये, कर्तव्य किंवा जबाबदारी सोपविलेला कोणताही नियुक्त प्राधिकारी किंवा अधिकारी किंवा कर्मचारी, या अधिनियमांतील प्रयोजनांचे उल्लंघन होईल किंवा ते निष्फळ ठरेल अशा उद्देशाने हेतुपुरस्सर कृती करील तर, त्यास अपराधसिध्दीनंतर, नव्वद दिवसांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

(२) शासनाच्या किंवा शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीखेरीज, कोणतेही न्यायालय या कलमाखालील शिक्षापात्र अपराधांची दखल घेणार नाही.

अभिलेख मागवण्याचा अधिकार. ९. कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गांपैकी कोणत्याही प्रवर्गांच्या कोणत्याही व्यक्तींवर, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा याबाबतीत दिलेल्या शासकीय आदेशांचे कोणत्याही नियुक्ती प्राधिकरणाने पालन न केल्यामुळे प्रतिकूल परिणाम झाला आहे असे शासनाच्या निदर्शनास आल्यास, किंवा निदर्शनास आणल्यास, शासन योग्य वाटतील अशा अभिलेखांची मागणी करू शकेल आणि तसे आदेश देऊ शकेल.

निवड समितीमधील प्रतिनिधित्व. १०. (१) शासनास आदेशान्वये, लोक सेवा व पदांकरिता नियुक्ती किंवा यथास्थिति, पदोन्नती याकरिता व्यक्तींची निवड करण्याच्या प्रयोजनार्थ निवड, चाळणी आणि विभागीय पदोन्नती समितीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास वर्ग यांमधील अधिकाऱ्यांच्या नामनिर्देशनाकरिता तरतूद करता येईल.

(२) शासनास, आदेशाद्वारे, कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील व्यक्तींच्या हितासाठी त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षा किंवा तशाच प्रकारच्या अन्य परिक्षा किंवा मुलाखती यांच्या संबंधातील शुल्कामध्ये सवलत देता येईल आणि उच्च वयोमर्यादा शिथिल करता येईल.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास अंमलात असलेले, कोणतीही स्पर्धात्मक परीक्षा किंवा तशाच प्रकारच्या अन्य परीक्षा किंवा मुलाखत यांच्या शुल्कांमध्ये सवलत आणि उच्च वयोमर्यादा शिथिल करणे यांसह सवलती आणि शिथिल करणाच्या संबंधातील शासकीय आदेश, त्यांमध्ये शासनाकडून फेरफार केला नसल्यास किंवा ते रद्द केले नसल्यास लागू असण्याचे चालू राहतील.

अनियमित नियुक्त्या निरर्थक असणे. ११. ह्या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेल्या कोणत्याही नियुक्त्या निरर्थक होतील.

सद्भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण. १२. या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणताही प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही वाद, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार. १३. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, तो एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता,

राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्यालगत नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा, यथास्थिति, तो अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा रद्द करणे यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

या अधिनियमाच्या तरतुदी त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या जोडीला असणे.

१४. या अधिनियमाच्या तरतुदी, त्यावेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींच्या जोडीला असतील आणि त्यांचे अल्पीकरण करणाऱ्या नसतील.

व्यावृत्ती.

१५. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच निवड प्रक्रिया आधीच सुरू झाली असेल अशा प्रकरणांना या अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत आणि अशी प्रकरणे, अशा प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि कायद्याच्या ज्या तरतुदी होत्या त्यांना अनुसरून हाताळण्यात येतील.

**स्पष्टीकरण** .—या कलमाच्या प्रयोजनार्थ, प्रस्तुत सेवा नियमांच्या अन्वये जेथे—

(एक) फक्त लेखी परीक्षा किंवा मुलाखतीच्या आधारे भरती करावयाची असेल आणि अशी लेखी परीक्षा किंवा, यथास्थिति, मुलाखत सुरू झाली असेल, किंवा

(दोन) लेखी परीक्षा व मुलाखत दोन्हींच्या आधारे भरती करावयाची असेल आणि अशी लेखी परीक्षा सुरू झाली असेल,

त्या बाबतीत, निवड प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे, असे मानण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

१६. (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, शासनास, प्रसंग उद्भवल्यावर, अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे सादर करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

2.2 Number of seats earmarked for reserved category as per Government of Maharashtra Rule

**References:**

https://www.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20Resolutions/Marathi/20070508172935001.pdf

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभागातील
अधिपत्याखाली सर्व तंत्र शिक्षण संस्थामधून
"विशेष मागास प्रवर्गाकरिता" राखीव जागा
ठेवणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन शुद्धिपत्रक क्रमांक विशएस ३३९५/११४०७/(६९४०) ताशि १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२.
दिनांक २१ मार्च, १९९६

**संदर्भ** :—(१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक : युएसजी १४९३/(२४२८) विशि–४
दिनांक २२ जून, १९९५

**शासन शुद्धिपत्रक** :—

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय/अनुदानित/विद्यापीठ व्यवस्थापित/विना अनुदानित संस्थांतील अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र/औषधनिर्माण शास्त्र वा व्यवस्थापन शास्त्र इत्यादी व्यावसायिक विद्याशाखांच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यासाठी मागासवर्गीयांकरिता आरक्षणाचे प्रमाण शासनाने यापूर्वीच खालीलप्रमाणे विहित केले आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती व अनुसूचित जातींतील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ टक्के |
| (२) | अनुसूचित जमाती | ७ टक्के |
| (३) | विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३ टक्के |
| (४) | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती) | २.५ टक्के |
| (५) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ टक्के |
| (६) | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २ टक्के |
| (७) | इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९ टक्के |
| (८) | विशेष मागासवर्गीय प्रवर्ग (एस.बी.सी) | २ टक्के |
| | एकूण : | ५२ टक्के |

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४, ५ व ६ मध्ये खालील-प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—

१. परिच्छेद क्र. ४ :—उपरोक्त आरक्षण प्रत्येक संस्थेत अभ्यासक्रमनिहाय असेल व ज्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश पद्धतीत मुक्त व मुल्यभारीत प्रकाराच्या जागा असतात त्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशा-साठी प्रत्येक प्रकारास त्या त्या प्रमाणात लागू पडेल.

परिच्छेद क्र. ५ :—संवर्गनिहाय आरक्षित जागा प्रथमत: भरण्यात याव्यात. एखाद्या मागासवर्गीय संवर्गातून उमेदवार उपलब्ध नसतील तर त्या संवर्गातील रिक्त जागा उर्वरीत संवर्गाच्या एकत्रित यादीतील गुणवत्तानुक्रमानुसार पूर्व नियोजित वेळी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा त्यांच्या विनंतीवरुन दुसऱ्या चांगल्या पसंतीच्या जागेवर प्रवेश बदल देण्यासाठी पुर्नविचार करण्यात यावा.

मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागांवर प्रवेश घेतलेले उमेदवार सर्वसाधारण गुणवत्तानु-क्रमानुसार खुल्या जागांवरील प्रवेशासाठी देखील पात्र राहतील. खुल्या जागेवर प्रवेश देतांना पूर्वीची संस्था अभ्यासक्रम संगत अबाधित राहत असेल तर सर्व सवलतींसह अशा प्रवेशांची समस्तरपालट करण्यात येऊन अशा उमेदवारांना खुल्या जागांवर प्रवेश मिळाला आहे असे समजण्यात यावे. त्यासाठी उमेदवाराने उपस्थित राहण्याची किंवा पसंती/इच्छा कळविण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. परंतु राखीव जागेवर प्रवेश झाला त्याक्षणी स्वत:चे पसंतीनुसार उपलब्ध नसलेल्या जागेवर खुल्या संवर्गातून प्रवेश मिळण्यासाठी पुर्नविचार व्हावा अशी इच्छा असेल तर मात्र उमेदवारास खुल्या जागांसाठी होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार आपल्या सर्वसामान्य गुणवत्तानुक्रमानुसार उपस्थित राहणे आवश्यक राहील. अन्यथा अशा प्रवेश पालटासाठी त्यांचा पुर्नविचार करता येणार नाही.

परिच्छेद क्र. ६ :—मागासवर्गीय उमेदवारांचे सर्वसाधारण गुणवत्तानुक्रमानुसार खुल्या जागांसाठी प्रवेश करतांना संस्थेत/अभ्यासक्रमात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण शासन निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत राहणार नाही.

२. हे शुद्धिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(ओं. शि. बिहाडे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

**पुणे विद्यापीठ, पुणे ७**

संदर्भ क्र. आरक्षण / ४२ / ३७०

आरक्षण कक्ष
दिनांक : ८–७–९६.

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये, / मान्यताप्राप्त संस्था.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणांकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/—
उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

पु. वि. मु.—५००–७–९६ (६१७)

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन
विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक
संस्थांमधून " विशेष मागास प्रवर्गाकरिता "
राखीव जागा ठेवणेबाबत

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : युएसजी–१४९३/(२४२८)–विशि–४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२

दिनांक : २२ जून, १९९५

**वाचा** : (१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३/२४२८/ विशि–४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक–जुलै १९९४.

(२) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी–१४९४/ प्र. क्र. २३६/मावक–५ दिनांक १३ जून, ९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक १५ जून, १९९५.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६–ब, दिनांक १५ जून, १९९५.

१. **शासन निर्णय** : राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती म्हणून विवक्षितपणे घोषित करण्यात आलेले जनसमुदाय वगळता अन्य काही जातीजमातीकडून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या कारणावरुन विशेष सवलत देण्याची मागणी लक्षात घेता, शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमाक सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५, दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक १५ जून, १९९५ मध्ये विशिष्ट जातीचा " विशेष मागास प्रवर्ग " यामध्ये समावेश करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. ज्या जातींचा " विशेष मागास प्रवर्ग " मध्ये ससावेश करण्यात आला आहे त्याची यादी पारशिष्ट " अ " मध्ये देण्यात आली आहे.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६–ब दिनांक १५ जून, १९९५ अन्वये " विशेष मागास प्रवर्ग " साठी २% आरक्षण शासकीय/निमशासकीय सेवेत ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

३. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३/(२४२८) विशि–४, दिनांक २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक–जुलै, ९४ अन्वये इतर मागास वर्गासाठी अकृषि विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व इतर शैक्षणिक संस्था यामधून प्रवेशासाठी आरक्षण ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशानुसार शैक्षणिक संस्थांमध्ये राखीव जागा ५०% या प्रमाणात ठेवण्यात आलेल्या आहेत. आता काही विशिष्ट जाती जमातींचा " विशेष मागास प्रवर्गा " त समावेश करण्यात आलेला असल्यामुळे या प्रवर्गाकरिता २% जागा उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमधून या आदेशान्वये राखून ठेवण्यात येत आहे. " विशेष मागास प्रवर्गा " करिता राखून ठेवण्यात आलेल्या २% जागा वाढल्याने आता शैक्षणिक संस्थांमधून राखीव जागांचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील :

| | | |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती व अनुसूचित जाती मधील बौद्धधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३% |
| (२) | अनुसूचित जमाती | ७% |
| (३) | विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३% |
| (४) | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| (५) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५% |
| (६) | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २% |
| (७) | इतर मागास वर्गीयांकरिता (ओ. बी. सी.) | १९% |
| (८) | विशेष मागास प्रवर्ग | २% |
| | एकूण | ५२% |

हे आदेश १९९५–९६ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहेत.

४. सदर आरक्षण प्रत्येक संस्थांमध्ये अभ्यासक्रम निहाय असेल आणि ते मुक्त आणि मूल्याधारित भागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

आरक्षित जागा या प्रथमतः भरण्यात याव्यात. मात्र आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला तरी गुणवत्तेनुसार त्या उमेदवारांच्या अभ्यासक्रम किंवा संस्था याबाबतच्या काही किंवा सर्व फक्त वरच्या पसंतीकरीता अराखीव जागांमधून प्रवेश देण्यासाठी त्यांच्या विनंतीनुसार पुनर्विचार करण्यात यावा.

५. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश देताना एखादा प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास ते आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात येत नसल्यामुळे व ते त्याच वर्षी भरावयाचे असल्यामुळे मागासवर्गीयांच्या इतर गटातील उमेदवारांना प्रवेश देवून आरक्षण पूर्ण करण्यात यावे. यासाठी दिनांक २७ जून, १९७४ च्या परिच्छेद २ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र अदलाबदलीने इतर प्रवर्गातून भरण्याची तरतूद करताना अशा तऱ्हेने उपलब्ध मागासवर्गीयांची संख्या मूळ आरक्षण अधिक अदलाबदलीने झालेले विद्यार्थी यांची संख्या धरुन ५२% पेक्षा अधिक असणार नाही.

६. शैक्षणिक वर्ष १९९५–९६ सुरु असल्यामुळे "विशेष मागास प्रवर्गा"त असणाऱ्या जातींमधून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता त्यांनी ३१ जुलै, १९९५ पर्यंत शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५, दिनांक १३ जून, १९९५ च्या जोडलेल्या परिशिष्ट "ब" मधील विवरण पत्रात जातीचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून घेऊन संबंधित संस्थाप्रमुखांकडे सादर करणे बंधनकारक राहील. वरील तारखेपर्यंत जर या प्रवर्गातील विद्यार्थी त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र शैक्षणिक संस्थाप्रमुखांना सादर करू शकले नाहीत तर, त्यांचा या राखीव जागांवर हक्क राहणार नाही. याचीही नोंद घेणे आवश्यक आहे.

७. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करण्यात येते की, हे आदेश सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या व समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**व्रि. ब. सेन**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**परिशिष्ट—"अ"**

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५, दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक १५ जून, १९९५ अन्वये "विशेष मागास प्रवर्ग" अंतर्गत करण्यात आलेली जातीची यादी.

| अ. क्र. | जातीचे नाव |
|---|---|
| १. | गोवारी, गवारी. |
| २. | माना. |
| ३. | (१) कोष्टी, (२) हलवा कोष्टी, (३) हलवा जात, (४) साळी, (५) लाडकोष्टी, (६) गढेवाल कोष्टी, (७) देशकर, (८) सालेवार, (९) पद्मशाली, (१०) देवांग, (११) काची बंध, (१२) पटवीस, (१३) सतसाले, (१४) साडे, (१५) जैनकोष्टी. |
| ४. | (१) कोळी, तत्सम जाती, (२) मच्छिमार कोळी, (३) अहीर कोळी, (४) खानदेशी कोळी, (५) पानकोळी, (६) ख्रिश्चन कोळी, (७) चुंबळे कोळी, (८) पानभरे कोळी, (९) सूर्यवंशी कोळी, (१०) मगिला कोळी, (११) सोनकोळी, (१२) वैती कोळी, (१३) खारवी, (१४) अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेले कोळी. |
| ५. | (१) मुन्नेरवार, (२) मुन्नुरवार, (३) मुन्नुर, (४) तेलगु मुन्नुर, (५) मुन्नुरवार तेलगु, (६) मुन्नरकापू, (७) कापेवार, (८) तेलगु कापेवार, (९) मुन्नरवाड, (१०) तेलगु फुलमाळी, या जाती. |

**पुणे विद्यापीठ, पुणे ७**

संदर्भ क्र. आरक्षण / ४२ / ५३३

आरक्षण कक्ष
दिनांक : २२–७–९५.

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये,
सर्व मान्यताप्राप्त संस्था.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणांकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/–
उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

पु.वि.मु.—५००–८–९५ (१०६९)

**References:**


- Number of seats earmarked for reserved category : Information available on Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon Rule

  https://nmu.ac.in/en-us/administration/scstcell.aspx

- Number of seats earmarked for reserved category as per Government of India Rule

  https://www.ugc.ac.in/pdfnews/6320608_reservation-Policy.pdf